जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 FEB 2024
पुढारी

# विद्यापीठ परिसराच्या पूर्व-पश्चिम भागास जोडणाऱ्या भूयारी मार्गाचे उद्या भूमिपूजन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पूर्व व पश्चिम भागास कायमस्वरुपी जोडण्याकरिता भूयारी मार्ग व सर्व्हिस रस्ता बांधण्याच्या कामाचे भूमिपूजन शनिवारी (दि. ३) दुपारी तीन वाजता उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पाटील यांच्या प्रयत्नांमुळे भूयारी मार्गाच्या कामासाठी शासनाकडून ८ कोटी ४८ लाख ८१ हजार ९४५ रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्यात २ कोटी ५० लाख रुपयांचा निधी विद्यापीठास प्राप्त झाला आहे. त्यामधून भूयारी मार्गाचा प्रारंभ होणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 FEB 2024
तरुण भारत

# विद्यापीठाच्या भुयारी मार्गाच्या कामाचे उद्या भूमीपूजन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पूर्व व पश्चिम भागास कायमस्वरुपी जोडण्याकरिता भुयारी मार्ग व सर्व्हिस रस्त्याचे भूमीपूजन शनिवारी ३ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजता उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते होणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या भुयारी मार्गाच्या कामासाठी महाराष्ट्र शासनाकडून ८ कोटी ४८ लाख ८१ हजार ९४५ रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्यात २ कोटी ५० लाख रुपयांचा निधी विद्यापीठास प्राप्तही झाला आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 FEB 2024
पुण्यनगरी

# भुयारी मार्गाचे उद्या भूमिपूजन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पूर्व व पश्चिम भागास कायमस्वरूपी जोडण्यासाठी भुयारी मार्ग व सर्व्हिस रस्ता बांधण्याच्या कामाचे भूमिपूजन शनिवारी (दि. ३) दुपारी ३ वाजता राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यावेळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल. ही माहिती कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी दिली. या कामासाठी शासनाकडून ८ कोटी ४८ लाख ८१ हजार ९४५ रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

जनसंपर्क कक्ष
02 FEB 2024 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या भुयारी मार्ग कामाचे उद्या भूमिपूजन

कोल्हापूर , ता. १ : शिवाजी विद्यापीठाच्या पूर्व व पश्चिम भागास कायमस्वरूपी जोडण्याकरिता भुयारी मार्ग व सेवा रस्ता बांधण्याच्या कामाचे भूमिपूजन शनिवारी (ता. ३) दुपारी तीन वाजता उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते होणार आहे. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 FEB 2024
तरूण भारत

# नॅनो सायन्सच्या विद्यार्थिनींना संशोधनासाठी शिष्यवृत्ती जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स ॲण्ड बायोटेक्नॉलॉजी या अधिविभागातील संशोधक विद्यार्थिनी कस्तुरी रोकडे यांची दक्षिण कोरीया येथील इन्चॉन नॅशनल विद्यापीठ येथे INU SURE लॅब व्हिजिटिंग स्टुडंट प्रोग्रॅम अंतर्गत निवड झाली आहे. यासाठी त्यांना २ लाख रूपये इतकी शिष्यवृत्ती मिळाली आहे. त्यांनी स्कूल ऑफ नॅनोसायन्स ॲन्ड बायोटेक्नॉलॉजी येथून बी. एस्सी. एम. एस्सी (एकात्मिक) नॅनोसायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजीची पदवी घेतली. सध्या त्या डॉ. टी. डी. डोंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच. डी. करत आहेत. नॅनोसायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी विभागातील एम.एस्सी भाग एकमध्ये शिक्षण घेत असलेल्या संध्या घाटगे यांना सीताराम जिंदाल फाऊंडेशनतर्फे पदव्युत्तर शिक्षणासाठी शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आली. शैक्षणिक खर्च व हॉस्टेल खर्च यासाठी ३३ हजार आहे. ती दोन वर्षासाठी आहे. याचप्रमाणे बी. एस्सी.-एम. एस्सी भाग एकमध्ये शिक्षण घेणाऱ्या माऊली पाटील यांना इंडिया बुल्स फाऊंडेशन तर्फे शिष्यवृत्ती जाहीर झाली असून ७५ टक्के शैक्षणिक शुल्क म्हणजे २० हजार प्रतिवर्ष असे एकुण पाच वर्षासाठी ही शिष्यवृत्ती त्यांना मिळणार आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू, डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. के. के. शर्मा यांनी विद्यार्थिनिंचे अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 FEB 2024
लोकमत

# नॅनोसायन्सच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स ॲण्ड बायोटेक्नॉलॉजी या अधिविभागातील संशोधक विद्यार्थिनी कस्तुरी अशोक रोकडे यांची दक्षिण कोरीया येथील इन्चॉन नॅशनल विद्यापीठ येथे लॅब व्हिजिटिंग स्टुडंट प्रोग्रॅम अंतर्गत निवड झाली असून, यासाठी त्यांना दोन लाख रुपये शिष्यवृत्ती मिळाली.

त्यांनी स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी येथून बी.एस्सी. - एम. एस्सी (एकात्मिक) नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजीची पदवी घेतली असून, त्या सध्या याच विभागात डॉ. टी. डी. डोंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी. करत आहेत. याच विभागातील एम.एस्सी. भाग एक या वर्गात शिक्षण घेत असलेल्या संध्या अनिल घाटगे यांना सीताराम जिंदाल फाउंडेशनतर्फे पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रतिवर्ष ३३ हजार शिष्यवृत्ती जाहीर केली. बी.एस्सी.- एम.एस्सी (एकात्मिक) भाग एकमध्ये शिकणाऱ्या माऊली सुभाष पाटील (रा. येळवडे, ता. राधानगरी) यांना इंडिया बुल्स फाउंडेशनतर्फे शिष्यवृत्ती जाहीर झाली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 FEB 2024
सकाळ

# उद्योग-व्यवसायाच्या प्रगतीसाठी महिन्यातून एकदा ताळेबंद तपासा

## डॉ. गुरव : इंजिनिअरिंग असोसिएशनतर्फे चर्चासत्र

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १ : उद्योग-व्यवसाय नेहमी प्रगती पथावर ठेवण्यासाठी आणि वेळोवेळो आर्थिक नियोजन, वेळीच उपाययोजना करण्यासाठी महिन्यातून एकदा ताळेबंद (बॅलेन्शीट) तपासून पाहा, असा सल्ला शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य आणि व्यवस्थापन विभागप्रमुख प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी येथे दिला.

कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशनतर्फे आयोजित 'वित्तीय व्यवस्थापन आणि प्रमाण विश्लेषण' याविषयावरील चर्चासत्रात ते बोलत होते. असोसिएशनचे अध्यक्ष दिनेश बुधले यांनी डॉ. गुरव यांचे स्वागत केले.

ताळेबंद नियमित तपासल्यास चुका लवकर समजतील आणि चुका लवकर समजल्यावर उपाय लवकर करता येतात. अनावश्यक जादा स्टॉकमुळे उद्योग-व्यवसाय अडचणीत येण्याची



कोल्हापूर : कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशनच्या चर्चासत्रात बोलताना प्रा. डॉ. ए. एम. गुरव.

शक्यता असते. उद्योग, उद्योगाची जागा, मशिनरीचा बारकाईने अभ्यास करावा गुंतवणुकीच्या प्रमाणात किती परतावा अपेक्षित याचा अभ्यास करावा, असे डॉ. गुरव यांनी सांगितले.

असोसिएशनचे उपाध्यक्ष बाबासो कोंडेकर, सचिव प्रसन्न तेरदाळकर, खजानीस कमलाकांत कुलकर्णी, हरिशचंद्र धोत्रे, कुशल सामाणी, विश्वजित सावंत उपस्थित होते.

0 2 FEB 2024 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नवे शैक्षणिक धोरण सकारात्मक : डॉ. हवालदार

■ सकाळ वृत्तसेवा

वारणानगर, ता. १ : नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात भारताच्या शिक्षण व्यवस्थेत भरीव सकारात्मक बदल घडून आणण्याची क्षमता आहे, असे मत डॉ. तानाजी हवालदार यांनी येथे व्यक्त केले.

वारणा विभाग शिक्षण मंडळ संचलित, यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्यातर्फे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण स्कूल कनेक्ट अभियान महाविद्यालयात राबविण्यात आले. या वेळी डॉ. हवालदार बोलत होते.



वारणानगर : वारणा महाविद्यालय आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्यातर्फे आयोजित अभियानात डॉ. तानाजी हवालदार यांनी मार्गदर्शन केले. या वेळी विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.


प्राचार्य डॉ. ए. एम. शेख यांनी स्वागत केले. प्रमुख वक्ते प्रा. डॉ. तानाजी हवालदार यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात अभ्यासक्रम आराखडा, श्रेयांक म्हणजे क्रेडिट पद्धती कशी असेल, चार वर्षांच्या अभ्यासक्रमात प्रमाणपत्र, डिप्लोमा, पदवी आणि संशोधन पदवी कशी असेल याबद्दल माहिती दिली.


उपप्राचार्य प्रा. एस. एन. शेख यांनीही मार्गदर्शन केले. प्रा. एस. एम. घायतड, प्रा. एस. डी. पाटील, प्रा. दीपाली पाटील, प्रा. जयंती उदगिरे, प्रा. साळुंखे, डॉ. प्रीती शिंदे, प्रा. वैभव बुड्ढे, प्रा. नामदेव चोपडे, प्रा. राहुल भाट, प्रा. घनश्याम कुंभार, प्रा. उत्तम पाटील सहभागी झाले. डॉ. बी. के. वानोळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सी. आर. जाधव यांनी आभार मानले.

02 FEB 2024

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ




# शाश्वत विकासाच्या दिशेने

ग्रामीण विकास



डॉ. एम. एस. देशमुख

**यंदाच्या अंतरिम अर्थसंकल्पामध्ये 'विकसित भारत २०४७' च्या दृष्टीने ग्रामीण भागातील विकासाच्या दृष्टीने मांडणी केली आहे. देशाच्या सर्वांगीण व शाश्वत विकासासाठी 'कृषी व ग्रामीण विकासा'वर विशेष भर दिला आहे. कृषी व अन्न प्रक्रियेमध्ये एकत्रीकरण, आधुनिक साठवणूक सुविधा, पुरवठा साखळी, विपणन, ब्रँडिंग व दुय्यम प्रक्रिया यांसारख्या कापणी-पश्चात तंत्रज्ञानात सरकारी व खासगी गुंतवणुकीला प्रोत्साहन दिले जाणार आहे.**


अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी ग्रामीण विकासासाठी १.७७ लाख कोटी आणि कृषी व शेतकरी कल्याणासाठी १.२७ लाख कोटी अशी एकूण ३.०४ लाख कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात केली आहे. कृषी क्षेत्रात 'नॅनो युरिया'नंतर 'नॅनो डीएपी'ला प्रोत्साहन देण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना खतांच्या कमी मात्रेत, कमी खर्चात जास्त उत्पादन घेता येईल. मोहरी, सोयाबीन, भुईमूग, तीळ व सूर्यफूल यासारख्या तेलबियांमध्ये देशाला आत्मनिर्भर करण्यासाठी सरकारी धोरण तयार करण्याचे अधोरेखित केले आहे. त्या दृष्टीने अधिक उत्पादन देणाऱ्या उच्च वाणांचे संशोधन, खरेदी, मूल्यवर्धन आणि पीक विमा योजना समावेश धोरणात केला आहे.

## उत्पादन वाढीचे धोरण

भारत जगातील सर्वांत मोठा दुग्धउत्पादन करणारा देश आहे. परंतु दुभत्या जनावरांचे सरासरी उत्पादन मात्र कमी आहे. अर्थसंकल्पात दुग्ध व्यवसाय वाढीच्या दृष्टीने उत्पादन वाढविण्याच्या धोरणांवर भर दिला आहे. याशिवाय 'मत्स्य संपदा' या नावाने मच्छीमारांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी एक नवा विभाग स्थापन करण्याची तरतूद केली आहे. पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागात तीन कोटी परवडणारी घरे बांधण्यासाठी सरकार अनुदान देणार आहे. देशातील तरुणांसाठी ५० वर्षांसाठीच्या बिनव्याजी कर्जांच्या योजनेसाठी एक लाख कोटींचे नियोजन केले आहे.

## शाश्वत ऊर्जेसाठी दमदार पाऊल

हरित ऊर्जा धोरणाच्या अनुषंगाने सरकारने सौर पॅनल वापरावर भर दिला आहे. एक कोटी घरांना सोलर पॅनलच्या माध्यमातून महिन्याला ३०० युनिटपर्यंतची वीज मोफत पुरवण्याचे ध्येय नमूद केले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील दुर्गम क्षेत्रात शाश्वत ऊर्जा उपलब्ध होऊ शकेल.



## आधुनिक तंत्र, विक्री व्यवस्था वाढवावी

कृषी व ग्रामीण विकासाच्यादृष्टीने आणखी मोठ्या प्रमाणात आर्थिक तरतूद गरज आहे. बदलते हवामान, अतिवृष्टी, अवकाळी पाऊस, गारपिटींसारख्या नैसर्गिक संकटांवर मात करण्यासाठी आधुनिक संरक्षित साधने, उपकरणे, तंत्रज्ञान पुरवायला हवे. ग्रामीण भागातील युवकांसाठी नव-उद्योजक धोरण तयार करावे. कृषी उत्पादन, प्रक्रिया व मूल्यवर्धनासाठी शिक्षण, प्रशिक्षण व प्रकल्प उभारणीसाठी आर्थिक तरतूद करावी. ग्रामीण भागात कृषी माल वाहतुकीसाठी पक्के व दुहेरी रस्ते, रेल्वे व हवाई वाहतूक सुविधांचा विस्तार व्हावा. सेंद्रिय शेती प्रोत्साहन योजनांचा विस्तार करताना कृषी मालाची थेट विक्री व कृषी आधारित व्यवसाय विस्तारासाठी विशेष योजना जाहीर कराव्यात. शेतीमालाला रास्त भाव, प्रक्रिया उद्योग, रस्ते, सिंचन, बांध, गोदामे, शीतगृहे, व लघु-सूक्ष्म प्रक्रिया उद्योग यामध्ये आर्थिक तरतूद गरजेची आहे.

**(लेखक शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागात अधिष्ठाता आहेत)**

" अंतरिम अर्थसंकल्पात विकसित भारताच्या उड्डाणासाठी धावपट्टी तयार करण्याच्यादृष्टीने वर्तमानातील कुशल व्यवस्थापन आणि भविष्याचा वेध घेत योग्य आराखडा तयार केला जात असल्याचे प्रतिबिंब दिसून आले. हे प्रभावीपणे साध्य केल्याबद्दल अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे अभिनंदन. गेल्या दशकातील कामगिरीचा आढावा घेताना आर्थिक वर्ष २०२५ मध्ये वित्तीय तूट ५.१ टक्के आणि वित्तीय वर्ष २६ मध्ये ४.५ टक्क्यांपर्यंत खाली आणण्याचे उद्दिष्ट ठेवून २०४७ पर्यंतचा विस्तृत आराखडा त्यांनी या अर्थसंकल्पात स्पष्ट केला. या अंतरिम अर्थसंकल्पात लोकप्रिय घोषणा टाळल्या आहेत. हे विशेष आहे. पायाभूत सुविधांसाठी आणखी तरतुदीची गरज आहे. भांडवली खर्चाची तरतूद नाममात्र ११ टक्क्यांनी वाढली आहे. थेट परकी गुंतवणूक वार्षिक ६० अब्ज डॉलरवरून आणखी वाढविण्यासाठी काही धाडसी उपायांची गरज आहे. विकसित भारतासाठी बँकिंग आणि ऊर्जा क्षेत्रातील सुधारणा, डिजिटल पायाभूत सुविधांना आणखी चालना देणे आवश्यक आहे. एकूणच, स्थिरता आणि समानतेवर भर याद्वारे विकसित भारताच्या उड्डाणासाठी धावपट्टी तयार केलेली आहे. आता जुलै २०२४ ची प्रतीक्षा आहे.

**- गोपीचंद पी. हिंदुजा,** अध्यक्ष, हिंदुजा समूह

इलेक्ट्रिक वाहनांची परिसंस्था मजबूत करण्यासाठी वाहन उत्पादन आणि चार्जिंग सुविधांवर भर देण्याच्या घोषणेमुळे देशात ईव्हीचा विकास आणि वापराला चालना मिळेल. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसाठी ई-बसचा अवलंब करण्यासाठी पेमेंट सिक्युरिटी मेकॅनिझमला प्रोत्साहनदेखील स्वागतार्ह पाऊल आहे."

**-विनोद अग्रवाल,** अध्यक्ष, सियाम

कारागिरांना पाठबळ देणाऱ्या योजना स्वागतार्ह

"सर्वसमावेशक वाढीसाठी विविध उपक्रम तसेच आर्थिक परिवर्तनातील महिलांची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित करणाऱ्या सरकार सातत्यपूर्ण प्रयत्न करत आहे, त्याची प्रचिती अंतरिम अर्थसंकल्पातून आली. पंतप्रधान 'विश्वकर्मा' योजना देशातील कारागीर समुदायाच्या सक्षमीकरणात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. विविध १८ क्षेत्रांमध्ये होणारा त्याचा लाभ सरकारच्या पारंपरिक कारागिरीचे जतन करण्याच्या आणि देशाच्या आर्थिक घडणीत महत्त्वपूर्ण योगदान देण्याच्या सर्वांगीण दृष्टिकोनाचे प्रतीक आहे.

**- टी. एस. कल्याणरामन,**
व्यवस्थापकीय संचालक, कल्याण ज्वेलर्स

सरकारने विविध उपक्रमांद्वारे नारी शक्तीला दिलेली चालना आणि ग्रामीण विकासावर लक्ष केंद्रित करण्याचे धोरण प्रशंसनीय आहे. महिलांच्या प्रगतीसाठी त्यांना मुद्रा योजनेच्या माध्यमातून दिले जाणारे कर्जाचे वाढते प्रमाण महत्त्वपूर्ण आहे. सर्वसमावेशक कार्यक्रमांच्या अंमलबजावणीद्वारे, सरकार वंचित समुदायांसाठी संधी निर्माण करत आहे. हे उपक्रम देशाच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देणारे शेतकरी, छोटे विक्रेते, व्यावसायिक आणि महिला उद्योजकांसह मुख्य घटकांनादेखील सशक्त करतात.

**- सदाफ सईद,**
मुख्य कार्यकारी अधिकारी, मुथूट मायक्रोफिन लि.

जनसपर्क कक्ष

02 FEB 2024 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# चिरंतन, समावेशक विकास अनुकूल अंदाजपत्रक

**सार्वजनिक अंदाज पत्रक हे देशाच्या चिरंतन आणि समावेशक विकासाचे प्रभावी साधन आहे. केंद्रीय अंदाज पत्रक २०२४–२५ देशाची त्या दिशेने वाटचाल करण्यास प्रयत्न करणारे आहे, असे दिसते.**



**प्रा. डॉ. पी. एस. कांबळे**
**अर्थशास्त्र विभाग**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

समावेशक विकासाचा भाग म्हणून देशातील गरिबांचे कल्याण म्हणजेच देशाचे कल्याण हे स्वप्न उराशी बाळगून ते पुढे नेण्याचा प्रयत्न हे अंदाजपत्रक करते. यातून देशातील गरिबांची संख्या २००५–२६ मधील ५५.३ टक्के वरून २०२२–२३ मध्ये ११.३ पर्यंत कमी झाल्याचा दावा हे अंदाज पत्रक करते. बहुआयामी गरिबांची संख्या ५ कोटीने कमी झाल्याचे आहे अंदाज पत्रक करते. तसेच ७८ लाख हातगाडी धारकांना प्रधानमंत्री सन्मान निधीतून मदत केली आहे. भारत हा तरुणाचा देश असल्याने त्यांना कौशल्ये देणे, मुद्रा योजने अंतर्गत तरुण ४३ कोटी उदोजकाना कर्ज पुरवठा केला जाणार आहे. याच कारणाने देशातील आय आय टी संख्या १६ वरून २३ पर्यंत, आय आय एम्स ७ वरून २२ आणि विद्यापीठे ७२३ पासून ११९३ पर्यंत वाढविली आहेत. शेतकरी अन्नदाता असल्याने त्यांच्या कल्याण साठी ११.८ कोटी शेतकऱ्यांना आर्थिक मदत, ४ कोटी शेतकऱ्यांना विमा लाभ २३६१ बाजारपेठा अद्यावत आणि व्यापार वाढण्यास ३ लाख कोटी खर्चाचा प्रस्ताव आहे. घरांची संख्या ३ कोटी पूर्ण झाली असून अजून २ कोटी घरे येत्या ५ वर्षात पूर्ण केली जाणार आहे. अर्थात मध्यम वर्गीय लोकांसाठी निवारा वाढविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. त्यामुळेच प्रधानमंत्री आवास योजनेवरील खर्च २०२३–२४ मधील ७५५९० कोटी वरून २०२४–२५ मध्ये ८०६७१ कोटी पर्यन्त वाढविले जाणार आहे.

स्त्रिया या देशाच्या विकासाचा ५० टक्के आधार आहे. त्यामुळे स्त्रियांच्या विकासासाठी या अंदाज पत्रकात तरतुदी केल्या आहेत. त्यांना मुद्रा अंतर्गत कर्ज, उच्च शिक्षणातील त्याची पटसंख्या १० वर्षात २८ टक्केने वाढ. तांत्रिक शिक्षणातील पटसंख्या ३ टक्केने बचत गटातून ८३ लाख स्त्रिया लक्षाधीश होण्यास मदत झाली आहे, ती पुढे सुरु राहणार. या बरोबरच त्यांचा कामातील सहभाग २३.३ टक्केवरून ३७ टक्केपर्यंत वाढण्यास मधात झाली आहे.

देशाच्या शाश्वत विकासासाठी २०७० पर्यंत शून्य कार्बन उत्सर्जन, त्यासाठी सौर उर्जा, कोळशापासून गॅस, सीएनजी, पीएनजी, बायोगॅस, सौर उर्जा विकास , वीज वाहने, बस, वस्तू निर्माण आणि फौंड्रीमध्ये जैविक साधनाचा वापर केला जाणार आहे. बिगर जीवाश्म उर्जा ४४ टक्केपर्यंत साध्य करण्याचा मानस आहे. चिरंतन आणि समावेशक विकास साध्य करण्यासाठी शेती आणि संलग्न, आरोग्य (६०१७१ कोटी), शिक्षण (१२४६३८ कोटी) , उर्जा ग्रामीण विकास, सामाजिक कल्याण (५६५०१ कोटी) मात्र सामाजिक गात निहाय चित्र स्पष्ट नाही. (२८६७८७ कोटी) राज्यांना स्थलांतर, वाहतूक, शहर विकास यात या अंदाज पत्रकात उलेखनीय वाढ केली आहे. या बरोबरच, केंद्र पुरस्कृत योजना, केंद्र स्थलांतरित योजना, वित्त आयोग अनुदान यात उलेखनीय वाढ केली आहे. मात्र त्याच वेळेला, अनुदान, वाणिज्य उद्योग यावरील खर्चात मात्र कपात केली आहे. कर रचनेत फारसा बदल नाही मात्र कांही कर लाभ या अंदाज पत्रकात समाविष्ट आहेत. महात्मा गांधी रोजगार योजनेवरील तरतूद ६०००० कोटी वरून ८६००० कोटी पर्यंत, आयुष्यमान भारत योजनेवरील खर्च ७२०० कोटी वरून ७५०० कोटीपर्यत वाढविला आहे. विशेष महत्वाची बाब म्हणजे भांडवली खर्च आणि पायाभूत सुविधा खर्च स्वागतार्ह वाढ आहे.

एकूणच शाश्वत आणि समावेशक विकास केंद्रित केंद्रीय अंदाज पत्रक असून देशाच्या विकास धोरणास अनुकूल आणि पोषक आहे. मात्र त्यात सुधारण्यास वाव आहे. त्यामुळे हे अंदाज पत्रक निश्चितपणे स्वगतार्ह आहे.